# सुमारे तीन वर्षापासुन बलत्काराचे गुन्हयात फरारी असलेल्या आरोपीस युनिट - ४, गुन्हे शाखेच्या पोलीसांनी केली अटक.

---

भारती विद्यापिठ पोलीस स्टेशन हद्दीत वाघजाईनगर, गुजरवस्ती पुणे येथे यापुर्वी अटक केले आरोपी नामे आकाश दिलेर मुल्ला याने अल्पवयीन फिर्यादी मुली बरोबर प्रेम संबध प्रस्तापिथ करुन तिस फुस लावुन पुणे येथे पश्चिम बंगाल वरुन आणुन तिस पाहीजे आरोपी टिपु याचे ताब्यात दिले होते. त्यानंतर नमुद दोन्ही आरोपी यांनी फिर्यादी अल्पवयीन मुलीस मारहाण करुन तिचे बरोबर शारीरीक संबध ठेवुन वेश्या व्यवसाय करणेस प्रवृत्त केले होते. या बाबत भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.न. ४२६/२०१६ भा.द.वि.कलम ३६६,(ब),३७२, ३७३, ३७६(२)( एन) ३२३, ५०६, ३४ सह बाल लैगिंग अत्याचार कलम ४,८,१२ सह पिटा ॲक्ट कलम ३,५,६ अन्वये गुन्हा दाखल होता. त्यावेळी टिपु हा फरार झालेला होता.

आरोपी टिपु याचे पुर्ण नाव व पत्ता माहीत नसल्याने त्यास शोधणेत अडचण येत होती. गुन्हे शाखा युनिट -४ चे पोलीस नाईक रमेश चौधर व निलेश शिवतरे हे पाहीजे फरारी आरोपीचा शोध घेत होते. त्यांना टिपु नावाचा इसम बुधवारपेठ पुणे येथे असलेबाबत बातमीदारा मार्फत माहीती मिळाली होती. त्याचा शोध घेत असतानाच टिपु याचे पुर्ण नाव टिपु सामसुर गांझी वय ३० वर्षे रा. जुना शागुर बिल्डींग, शेवटचा मजला, शुक्रवारपेठ पोलीस चौकीजवळ, बुधवारपेठ पुणे असे असल्याचे समजले. दिनांक ३/४/२०१९ रोजी टिपु हा क्रांती चौक,बुधवार पेठ पुणे येथे येणार असल्याची माहीती पो.ना. रमेश चौधर व निलेश शिवतरे यांना मिळाल्याने युनिट -४ चे स्टाफने सदर ठिकाणी सापळा टाकुन टिपु यास पकडले. सदर इसम हा दाखल गुन्हयातील टिपु असल्याची खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही साठी भारती विद्यापिठ पोलीस स्टेशनचे ताब्यात देणेत आलेले आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री. अंजुम बागवान याचे मार्गदर्शनाखाली स.पो.फौज शंकर पाटील, भालचंद्र बोरकर, पोलीस कर्मचारी रमेश साबळे, रमेश चौधर, निलेश शिवतरे, सागर घोरपडे, हनुमंत बोराटे यांनी केलेली आहे.

दिनांक ०४/०३ /२०१९

Bagwan

( अंजुम बागवान )

पोलीस निरीक्षक,

युनिट – ४, गुन्हे शाखा,पुणे शहर